## चर्चा करा :

- घाण पाणी आपल्या शरीराचे कशा रीतीने नुकसान करते ?
- अशा पाण्यामुळे कोणी आजारी पडला असेल अशा एखाद्याला तुम्ही जाणतात का ? त्या विषयी गोष्ट करा.
- किपलच्या घरी जेव्हा पाहुणा आला, त्यांनी पाहुण्याला पाण्याच्या ऐवजी थंड पेयसाठी विचारले, कारण त्यांनी विचार केला की ते असे पाणी पिऊ शकणार नाही. तुमच्या मते किपलच्या कुटुंबाने त्यांच्या स्वत:च्या पिण्याच्या पाण्यासाठी काय केले पाहिजे ?
- पाहुण्याने थंड पाणी घेण्यास नकार दिला. त्यांनी असे का सांगितले ? विचार करा.

## पाण्याचा खेळ

उत्तर गुजरातमध्ये मोठा वॉटर पार्क आहे. एक दिवस सचिन आणि नीरू त्यांच्या आई वडीलांसोबत वॉटर पार्कला गेले. तेथे खुप पाण्याचे कारंजे होते. नीरू म्हणाली ''बघ सचिन पाण्यामध्ये किती सर्व राईड्स आहेत.''



''या बाजूला मोठे तलाव !'', सचिन म्हणाला छब ! छब ! छब ! दोघांनी मागे पाहिले. झूम झूम झूम आवाज करत पसरट घसरगुंडीमध्ये वेगाने घसरणारे बालके पाण्यात पडत होते.



सचिन घसरगुंडीत खूपच वर गेला. थोड्याच वेळात तो धबाक करून पाण्यात पडला. नीरू आश्चर्याने ओरडली.

नंतर लगेच त्यांनी पार्कच्या बाहेर खुपच मोठा आवाज ऐकला. प्रत्येक जण वेगाने दरवाजाकडे धावले. तिथे लोकांची



गर्दी रिकाम्या बादल्या आणि घागर घेऊन उभे होते. एक लहान बालक खाली बॉटल घेऊन त्याच्या आईला चिपकलेला होता. सचिनची आई गर्दीत एका स्त्री जवळ गेली. काय गोष्ट आहे ? तीने विचारले.

त्या स्त्रीने रागाने उत्तर दिले, ''तुम्ही विचारतात काय गोष्ट आहे ? आमच्या विहीरीत पाणी नाही. आठवड्यातून एक दिवस पाण्याचे टॅन्कर येते. तेव्हाच आम्हाला पाणी मिळते आज ते आले नाही आणि इथे एवढे पाणी तुम्हाला खेळण्यासाठी आहे. आम्ही काय करावे सांगा ?''



## वाचा आणि लिहा :

- तुमच्या घरात कधी पाण्याची उणीव झाली आहे का ? कधी ?

  ______________________________

- तेव्हा तुम्ही काय करतात ?

  ______________________________

- तुम्ही कधी पाण्यात खेळले आहात का ? कुठे आणि कधी ?

  ______________________________

- तुम्हाला कधी पाण्यात खेळण्यासाठी नकार देण्यात आला आहे ? का ?
  - ______________________________
  - ______________________________

- तुम्ही तुमच्या जवळपास पाणी वाया जातांना पाहिले आहे का ? चर्चा करा.

  ______________________________

- वॉटर पार्कमध्ये खेळण्यासाठी खूपच पाणी होते. परंतु जवळील गावात लोकांना पिण्यासाठी पाणी पण मिळत नव्हते. त्या विषयी विचार करा आणि चर्चा करा.

- जर तुम्ही वॉटर पार्कमध्ये गेलात, तर तिथे पाणी कुठून येते ते शोधून काढा.

## हे पिऊ शकतो का ?

### एलिसब्रिज, अहमदावाद




लिफ्ट विसाव्या मजल्यावर उभी राहिली. स्मितला लिफ्टमध्ये जायला खूप आवडते. आज शाळेला सुट्टी आहे. स्मित त्याच्या आईसोबत अंजू मॅडमच्या घरी आला.त्यांची आई तिथे काम करत होती.ते घर शांत, स्वच्छ आणि चमकत होते. अंजू वर्तमानपत्र वाचत होत्या. स्मितला पाहून त्यांनी हसून विचारले, ''काय आज सुट्टी आहे ?'' मॅडमने टीव्ही सुरू केला आणि थोड्याच वेळात स्मित कार्टूनच्या दुनियते हरवला. एवढयात अंजू मॅडमने आरोळी मारली. ''अग छाया या विस्तारात पिण्याच्या पाण्यात नालीचे पाणी मिसळले गेले आहे. असे वर्तमानपत्रात आहे. या घाण पाण्यामुळे खुप लोकांना अतिसार आणि उलटी झाली आहे. तू कालचे भरलेले पाणी खाली करून दे.थोडे पातेल्यातले पाणी उकळवून दे आणि तुझ्या घरासाठी उकळविलेले पाणी घेऊन जा.'' स्मित ते ऐकून आनंदित झाला. आज घरच्या पाण्यासाठी लाईनमध्ये उभे राहण्यापासून मुक्ती मिळाली.



### तुमच्या नोटबुकमध्ये लिहा :

- अंजू वर्तमानपत्र वाचल्यानंतर का चिंतित होत्या ?
- अंजूने अगोदरच्या दिवशी भरलेले सर्व पाणी सांडून टाकण्यास सांगितले. हे पाणी इतर कामासाठी घेता आले असते का ? कोण कोणत्या कामासाठी ?
- त्यांनी पाणी स्वच्छ करण्याची कोणती युक्ती सांगितली ?

- तुम्ही पाणी स्वच्छ करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती जाणतात का ? त्यांचे वर्णन करा.
- कदाचित अंजूने वर्तमानपत्र वाचले नसते आणि प्रत्येकाने उकळविल्या शिवाय पाणी पिले असते, तर काय झाले असते ?

## चर्चा करा :

- स्मित जिथे राहतो, तिथे प्रत्येकाला सार्वजनिक नळावरून पाणी भरण्यासाठी लाईनमध्ये उभे रहावे लागते अंजूच्या घरात नळात संपूर्ण दिवस पाणी येते. असे का ?
- अंजूने वर्तमानपत्रात पाण्याविषयी वाचले. तुम्ही वर्तमानपत्रात पाण्याविषयी वाचले आहे का ? कशा प्रकारच्या बातम्या ?


## स्वतः करा आणि चर्चा करा :

- शेवटच्या एका महिन्याचे वर्तमानपत्रात पाणी संबधित सर्व बातम्या पहा आणि वर्तमानपत्रातून कापून एकत्र करा. एका मोठ्या कागदावर सर्व कापलेले भाग चिकटवा वर्गखंडात चर्चा करा.

तुम्हाला कधी अतिसार आणि उलटी झाली आहे का ? तेव्हा तुम्हाला कसे वाटले होते ? जेव्हा अतिसार उलटी होते तेव्हा, आपल्या शरीरातून पाणी खूपच कमी होते. जे शरीरासाठी नुकसानकारक आहे. आपल्या शरीरातील कमी झालेले पाणी पुन्हा पूर्ण भरून काढणे महत्त्वाचे आहे. संडास–उलटी होते तेव्हा खूपच पाणी पिले पाहिजे. आपण पाण्यात थोडे मीठ आणि साखर पण मिसळली पाहिजे.

### मीठ आणि साखरेचे मिश्रण बनविणे:

एक प्याला उकळविलेल्या पाण्यात एक चमचा साखर आणि चिमूटभर मीठ टाका. आणि थंड होऊ द्या. या मिश्रणाला चाखा. पाणी आपल्या अश्रूंपेक्षा जास्त खारट करू नये.



जेव्हा व्यक्तिला अतिसार आणि उलटी झाली असेल तेव्हा हे मिश्रण प्यायला द्यावे सोबतच

हलका आहार द्यावा. लहान बालकांना आईचे दूध सतत देणे आवश्यक आहे. थोड्या औषधी पण आवश्यक आहे. त्या घरी बनविलेल्या पण असू शकतात. जर संडास-उलटी बंद झाली नाही तर डॉक्टरांचे मार्गदर्शन घेणे जरूरी आहे.

## शाळेत पाण्याची माहिती :

तुमच्या वर्गातील विद्यार्थ्यांचे तीन गट बनवा.

- एक गट शाळेत पिण्याचा पाण्याच्या व्यवस्थेविषयी माहिती मिळवेल.
- दुसरा गट शाळेच्या शौचालयाच्या व्यवस्थे विषयी माहिती मिळवेल.
- तिसरा गट वर्गातील बालकांना झालेल्या आजारा विषयी माहिती मिळवेल.

खाली दिलेले प्रश्न प्रत्येक गटाला माहिती एकत्र करण्यासाठी मदतरूप होईल.

**गट १**

अवलोकन करा आणि नोंदा.

- जे लागू पडत असेल त्या बॉक्समध्ये (√) ची निशानी करा.
  - तुमच्या शाळेत पाणी कुठून येते ?

    नळ ☐ टॅन्क ☐ हॅन्डपंप ☐ इतर ☐
  - तुमच्या शाळेत तुम्ही पिण्यासाठीचे पाणी कुठून घेतात ?

    नळ ☐ टॅन्क ☐ हॅन्डपंप ☐ इतर ☐
- जर नळ, माठ आणि हॅन्डपंप नसेल तर तुम्ही पिण्याचे पाणी कुठून मिळवाल ?

  ______________________________
- सर्वच नळ आणि हॅन्डपंपमध्ये पाणी आहे का ?

  ______________________________

- एखादा नळ टपकत किंवा लीक होत असेल, तर तुम्ही काय कराल ?

- सर्व माठ पाण्याने भरलेले आणि झाकलेले आहेत का ?

- माठ आणि पाणी भरण्यासाठीची दुसरी कोण कोणती भांडी स्वच्छ केली जातात ?

- पाण्याला पिण्यालायक कशा रितीने बनविले जाते ?

- माठ किंवा भांड्यामधून चंबू शिवाय पाणी घेतल्याने काय होते ?

- पाणी पिण्याचा नळ किंवा माठाजवळील जागा रोज कशा रितीने स्वच्छ करण्यात येते ?

## विचार करा आणि चर्चा करा :

- पाणी पिण्याची जागा का घाण होते ?
- ही जागा स्वच्छ ठेवण्यासाठी आपण काय करू शकतो ?

## शोधून काढा आणि तुमच्या नोटबुकमध्ये लिहा :

- भांडी किंवा माठ आणि चंबू किती वेळा (दिवसातून एकवेळा, दोन दिवसात एकवेळा, वगैरे) स्वच्छ केले जाते ? त्याला कोण स्वच्छ करतो ?
- तुमच्या शाळेत किती बालके आहेत ? किती नळ, माठ किंवा हॅन्डपंप आहेत ? ते बालकांसाठी पुरेसे आहेत का ?
- पाणी पिण्याच्या आजूबाजूची जागा कोण साफ करते ?
- खाली सांडलेले पाणी कुठे जाते ?

### गट २

अवलोकन करा आणि नोंदा.

- बॉक्समध्ये(√) ची निशानी करा.
  - तुमच्या शाळेत शौचालयाची कशा प्रकारची व्यवस्था आहे ?

    बांधलेले शौचालय    मोकळी जागा

- किती शौचालय आहेत ?
- मुले आणि मुलींसाठी वेगळे शौचालय आहे का ?   हो   नाही
- शौचालयात पाणी येते का ?   हो   नाही
- पाणी कुठून येते ?
  - नळा द्वारे   हो   नाही
  - टाकीमधून   हो   नाही
  - घरून आणण्यात येते   हो   नाही
- शौचालयाजवळ हात धूण्यासाठी पाणी असते का ?   हो   नाही
- शौचालयाचा उपयोग केल्यानंतर तुम्ही हात धुतात का ?   हो   नाही
- एखादा नळ लीक किंवा टपकत असेल असा आहे का ?   हो   नाही
- शौचालयाला स्वच्छ ठेवण्यात येते का ?   हो   नाही

### शोधून काढा आणि लिहा :

- तुमच्या शाळेत किती मुले आणि मुली आहेत ?

  मुली    मुले



- मुले आणि मुलींसाठी किती शौचालय आहेत ?

  मुली ____ मुले ____

- जर नळ नसेल, तर, शौचालयात पाणी कोण ठेवते ? पाणी कुठून आणण्यात येते ?

  ________________

- या जागेला स्वच्छ कोण ठेवते ?

  ________________

**सांगा :**

- शौचालय स्वच्छ ठेवण्यासाठी काय काय केले पाहिजे ?
- आपण प्रत्येकजण त्यासाठी काय करू शकतो ?
- तुम्ही बस स्टेशन आणि रेल्वे स्टेशनवर शौचालय पाहिले आहेत का ? ते घराच्या शौचालयापेक्षा कशा रितीने वेगळे आहेत ?

**गट ३**

तुमच्या वर्गखंडात मुलांसोबत चर्चा करा आणि खाली दिलेले कोष्टक पुर्ण करा. शेवटच्या कित्येक महिन्यात वर्गामधून किती बालके यापैकी कोणत्याही रोगाची शिकार झाली आहे का ? अशा बालकांची नावे लिहा.


| क्रम | अतिसार | उलटी | अतिसार आणि उलटी | पिवळी लघवी, पिवळी ( बबूळ ) त्वचा आणि डोळे, बारीक ताप | पोटात दुखणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

या माहितीवरून तुम्ही काय शोधले त्याची चर्चा तुमच्या शिक्षकासोबत करा. तुम्ही शोधलेले मुद्दे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनावरून अहवाल बनवा. तुमचा अहवाल शाळेच्या प्रार्थनासभेत वाचा. त्याला नोटीस-बोर्डवर लावा.

## वडीलधाऱ्यांची दीर्घदृष्टी

अंदाजे तीस वर्षापुर्वीची ही गोष्ट आहे. राजकोटच्या राजसमढियाळा गावात पाण्याचा बिकट प्रश्न निर्माण झाला. त्या वेळच्या दीर्घदृष्टी असाणाऱ्या सरपंचश्रींनी जिल्हा ग्रामीण विकास सत्तामंडळ (DRDA) चा संपर्क केला. गावात चेकडॅम बनविण्यासाठी शिफारस केली. ग्रामीण विकास सत्तामंडळाने १९८५ मध्ये या गाावात १०९० हॅक्टर विस्तारामध्ये जवळजवळ पंचेचाळीस चेकडॅम बनविले. दुसऱ्या वर्षी या विस्तारात खुप पाऊस पडला. यामुळे सर्व चेकडॅममध्ये पाण्याचा संग्रह झाला. पाण्याची पातळी वर आली. मात्र पंधरा मीटरच्या सामान्य खोलीने लोकांना पाणी उपलब्ध झाले. वर्ष २००२ मध्ये येथे दुष्काळ पडला. तरीपण वडिलाधाऱ्यांच्या ज्या-त्या वेळेच्या दीर्घदृष्टीमुळे गावातील लोकांना समस्या पडली नाही. या वर्षी पण लोक तीनही ऋतूत पीक घेऊ शकले. लोकांच्या सुखसोयी आणि समृद्धी मध्ये पण वाढ झाली.

**शिक्षकांसाठी :** कोष्टकात मुले समजतील अशी सामान्य लक्षणे दिले आहेत जर हे कॉलेराने झाले असेल, तर तुम्ही त्यांच्या मदतीने याची चर्चा करू शकतात. सर्वच रोगाची नावे मुलांना येतील ते महत्त्वाचे नाही.



# प्रकरण १९
# सोबत जेऊया

**वर्गात उजवणी :**

वॅकेशन पूर्ण झाले. आज शाळा सुरू झाली. सुट्ट्यांमध्ये कशी मज्जा केली ? सर्वजण गोष्टी करीत आहेत.

मीना : तू हातावर मेहंदी का लावली आहे ?

आरती : माझ्या काकाचे लग्न होते म्हणून ...

मीना : अग खुपच मज्जा आली असेल ...

आरती : हो मजाच मज्जा... सोबत जेवण्याची पण मज्जा.

रेहाना : आपण आपल्या वर्गात पण सोबत जेवलो तर ?

डेविड : मजा येईल. चला तसेच करूया.

सर्वांनी वर्गात उजवणी करण्याचे नक्की केले. सर्व मुले घरून काय काय आणतील ते सांगू लागले. सगळ्यांनी वस्तू आणून शनिवारी खरोखर उजवणी केली. विविध प्रकारचे पदार्थ खायला मिळाले. सर्व सोबत खेळले, गाणी म्हटली आणि नाचले.

## तुमच्या नोटबुकमध्ये लिहा :

- तुम्हाला इतरांसोबत जेवायला आवडते का ?
- कोणत्या प्रसंगी तुम्ही तुमच्या मित्रांसोबत जेवतात ?
- तुम्ही तुमच्या वर्गात कधी उजवणी केली आहे का ? कधी ? तुम्ही उजवणी कशाप्रकारे केली ?
- तुम्ही आणि तुमच्या मित्रांनी उजवणी साठी काय-काय आणले होते ?
- तुम्ही सर्व काय जेवले होते ?
- तुम्ही तुमच्या उजवणीसाठी कोणाला आमंत्रण दिले ?
- उजवणीमध्ये कोण आले नाही ? का ?

## उत्तरायण साजरा करूया

पिंकी पहाटे उठली. तिचे मित्र सेजल, आयुष, तनवीर, फातिमा आणि इकबालला स्वत:च्या घरी बोलवण्यासाठी पळाली. आज उत्तरायण आहे.सर्व आनंदात होते.



उत्तरायण साजरा करण्यासाठी त्यांनी खास तयारी केली होती. ते उत्तरायण कशा रितीने साजरा करतील ? चला वाचूया.

ते खूप लवकर उठले होते. मोठ्या भावांनी अगोदरच पतंगाची किन्ना बांधून ठेवले होते. पिंकीच्या आजीने तिळाचे लाडू आणि शेंगदाण्याची चिक्की बनविली होती.

सेजलने तिच्या घरून मुरमुऱ्यांचे लाडू आणले. तनवीरने स्वत:च्या मळ्यातून बोरं आणली. आयुबची आई ताजी बोरं देऊन गेली.

स्वयंपाक घरात पिंकीची आई उंधियु बनविण्याची तयारी करीत आहे. उंधियु बनविण्यासाठी काय-काय पाहिजे, माहिती आहे तुम्हाला ? गवार, वाल आणि वांगे.

बटाटा आणि टोमॅटो पण खरे. केप्सिकम (शिमला मिरची), कोथंबिर, आणि आले सारखे मसाले पण पाहिजे. रताळे, सूरण वगैरे शिवाय तर उंधियाची मजाच नाही. मम्मीने मेथीच्या भाजीचे वडे पण त्यात टाकले. इकबाल तर एवढे सर्व पाहून आश्चर्यचकित झाला.

आजी गरमा गरम जलेबी उतरवत होत्या. सर्वांनी खाण्याचे सुरू केले.

सर्व आता पतंग उडविण्यासाठी गच्चीवर गेले. कोणी पतंग उडविला तर कोणी फिरकी पकडली.

ऐ कापला... ऐ गेला... असे ओरडत गीत पण म्हटले.

संपूर्ण दिवस सर्व सूर्याच्या उन्हात राहिले. उत्तरायणची खूप मजा केली.

## चला चर्चा करूया :

- उत्तरायण केव्हा साजरा करण्यात येतो ?
- सर्वच धर्माचे लोक उत्तरायण साजरा करतात ते तुम्ही जाणतात का ?
- चिक्की आणि तिळाचे लाडू कशा रितीने बनतात ?
- तुमच्या घरी उंधियु घरी बनवतात की बाहेरून आणतात ?
- उंधियु बनविण्यासाठी अगोदरपासून काय काय तयारी करावी लागते ?



## शोधुन काढा आणि सांगा :

- गावात किती लोकांनी उत्तरायणच्या दिवशी उंधियु बनविले असेल ? अनुमान करा.
- तुम्ही रात्री पण उत्तरायण साजरा करतांना पाहिले आहे का ? तुम्हाला ते आवडले का ?
- तुमचे मित्र कोणकोणते सण साजरा करतात ?
- त्या दिवशी तुम्ही काय-काय जेवतात ?
- सणांसाठी विशिष्ट प्रकारचे आहार कोण बनवितो ?
- तुम्ही काही सणांमध्ये खास प्रकारचे किंवा रंगाचे कपडे परिधान करतात का ?
- उत्तरायणला दुसऱ्या कोणत्या नावाने ओळखले जाते ?

## मध्यान्ह भोजन :

दुपारचा दीड वाजला आहे. मैदानातून स्वयंपाकाचा सुगंध येत आहे. पोटात गुडगुड होत आहे. भूकेमुळे शिकण्यात पण लक्ष नाही.

टन... टन... टन... घंटा वाजली. सर्व बालके हात धुण्यासाठी धावले. हात धुतल्यावर आम्ही रांगेत जेवायला बसलो. शाळेमधूनच प्रत्येकाला ताट दिले जेवण्याअगोदर आम्ही सगळ्यांनी सोबत गायन केले.

''सोबत खेळूया,
सोबत जेऊया,
सोबत करूया सर्व काम,
कायम रहा आमच्या सोबत
कणाकणात वसणारे श्रीभगवान''



आज जेवणात चणाचाट, थेपला आणि कोरडी भाजी आहे. काल, आम्ही सुखडी आणि वेजिटेबल खिचडी खाल्ली होती. शाळेच्या स्वयंपाक घराच्या बाहेर रोजच्या जेवणाची यादी ठेवलेली आहे. तो आम्हाला आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी काय मिळेत ते दर्शविते. जेव्हा आम्हाला तिथी भोजनमध्ये मिठाई मिळते तेव्हा खूप मजा येते !

शाळेत मध्यान्ह भोजन वेळेची एक दुसरी रसप्रद गोष्ट आहे. रोज रांगेत आम्ही आमची जागा बदलतो आणि एक नवीन बालकासोबत बसतो. मला ते आवडते कारण की, मी नवीन मुलांना भेटतो आणि नवीन मित्र बनवितो.

आमचे शिक्षक काळजी घेतात की सर्वांना ताजे आणि गरम जेवण मिळेल. पालक पण तिथी भोजन देऊन त्यात मदत करतात.

आता सर्व वस्तू चांगल्या आहेत. आम्ही ताजे, गरम आणि शिजवलेले भोजन सोबत जेवतो. सर्व बालके भोजन पूर्ण करतील आणि त्याचा बिगाड करणार नाही याची काळजी घेतो.

सोबत जेवणाची खूपच मज्जा येते. कधी कोणी घरून जेवल्याशिवाय आले तर येथे पोटभर जेवतात. पण एकदम रिकाम्या पोटी तुम्हाला शिकायला आवडेल ? अनुमान करा.

## शोधुन काढा आणि नोटबुकमध्ये लिहा :

तुमच्या शाळेत दिले जाणाऱ्या भोजनाविषयी लिहा.

- भोजन कोणत्या वेळी देण्यात येते ?
- शाळेत तुम्हाला भोजनात काय मिळते ?
- तुम्हाला जे मध्यान्ह भोजन मिळते ते आवडते का ?
- तुम्हाला जे भोजन मिळते ते पर्याप्त आहे का ?
- तुम्ही तुमचे स्वत:चे ताट आणतात की शाळेतून मिळते ?
- भोजन कोण वाढते ?
- तुमचे शिक्षक तुमच्या सोबत जेवतात का ?
- शाळेच्या बोर्डावर आठवड्याच्या भोजनाची यादी लावली आहे का ?
- तुम्हाला बुधवार आणि शुक्रवारी काय मिळते ?
- जर तुम्हाला तुमच्या शाळेच्या भोजनाच्या यादीत बदल करण्यास सांगण्यात आले, तर तुम्ही काय बदल इच्छितात ? तुम्ही खाण्याचे काय पसंत कराल ? तुमची स्वत:च यादी बनवा.

| दिवस | भोजन |
|---|---|
| सोमवार | |
| बुधवार | |
| शुक्रवार | |

## मध्यान्ह भोजन प्रत्येक बालकाचा हक्क

आपल्या देशात अनेक बालके असे आहेत की ज्यांना पूरेसे जेवण मिळत नाही. शाळेत पण उपाशी येतात.

आपल्या देशातील सर्वोच्च न्यायालयाने आदेश केला आहे की प्राथमिक शाळेत शिकणाऱ्या सर्व बालकांना गरम, शिजवलेले भोजन मिळाले पाहिजे. हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे.



# प्रकरण २०

# आहार आणि मज्जा

ट्रिंग... ट्रिंग... ट्रिंग ! दरवाज्याची घंटी वाजली. मनप्रीतने दरवाजा उघडला तर दिव्या आणि स्वस्तिक होते. ''सुरजीत, पहा कोण आले आहे ते !'' त्याने उत्साहित होऊन सांगितले, सुरजित धावत आली. जेव्हा तिने तिच्या मित्रांना पाहिले आणि आनंदाने त्यांना मिठी मारली व म्हणाली, ''तुम्ही कधी वसतिगृहातून आले ?'' स्वस्तिक म्हणाला, ''आता कालच. तुझे आई-वडील कुठे आहेत ? आम्ही त्यांना भेटू इच्छित आहात.''

सुरजित म्हणाली, ''ते गुरूद्वारा गेले आहेत. आम्ही पण तेथे जाणार आहोत.'' दिव्या म्हणाली, ''अरे खूप छान, आम्ही तुझ्या सोबत येतो.''

सुरजितने विचारले, ''तू सुटयांमध्येच घरी येते. तुला वसतिगृहात रहायला आवडते का ? तुम्ही तुमच्या परिवाराला खूपच आठवण करत असाल.''

दिव्या म्हणाली, ''आम्ही त्यांची आठवण करतो, परंतु वसतिगृहाच्या जीवनात खूप मजा आहे. खुप वेळा आम्हाला भोजन आवडत नाही तरीपण आम्ही सर्व बालके सोबत जेवून खुपच मजा करतो.''

स्वस्तिक हसता–हसता म्हणाला, ''तुला माहीत आहे, जेव्हा वसतिगृहामध्ये कोणाच्या घरून बनविलेले भोजन येते तेव्हा आम्ही सर्व त्याच्या रूमकडे धावत जातो. ते थोड्या मिनिटातच संपवून टाकतो.''

- तुम्ही वसतिगृहात शिकला आहात का ? जर नाही तर, जे वसतिगृहात रहात असतील अशा एखाद्या सोबत चर्चा करण्याचा प्रयत्न करा आणि शोधून काढा.
    - वसतिगृहात इतर सर्व शाळेपेक्षा काशा रितीने वेगळे आहे ?
    - तेथे त्यांना कसे भोजन मिळते ?
    - वसतिगृहात बालके कुठे बसून जेवतात ?
    - वसतिगृहात बालकांसाठी भोजन कोण बनविते ? भोजन कोण वाढते ?
    - भांडी कोण धुते ?
    - कधी बालके घरच्या जेवणाची आठवण करतात का ?
    - तुम्हाला वसतिगृहात जायला आवडते का ? का ?



## गुरुद्वारावर

बालकांनी गुरुद्वारा जातांना रस्त्याने गोष्टी केल्या. तेथे गेल्यावर त्यांनी डोके झाकुन घेतले.

ते गुरुद्वाराच्या स्वयंपाकघरात गेले. तेथे अनेक प्रवृत्ती चालू होत्या. जेवणाचे मोठ्या भांड्यामध्ये बनविण्यात येत होते. एकीकडे चणे आणि उडदाची डाळ वाफवली जात होती.





दूसरी तरफ पतीले में आलू दुसऱ्या भांड्यामध्ये फ्लावर आणि बटाट्याची भाजी बनत होती. स्वस्तिक म्हणाला, ''तिथे तुझे वडील आहेत. सुरजित, चला पाहूया आणि त्यांना भेटूया.''

''तुम्ही इथे काय करीत आहात ?'' मनजितसिंग बालकांना पाहून आनंदित झाले.

स्वस्तिकने विचारले, ''काका, आम्ही पण स्वयंपाकात मदत करू का ? तुम्ही काय बनवित आहात ?''

मनजितसिंग म्हणाले, ''मी कढाहप्रसाद (शीऱ्या सारखा) बनवत आहे. या मोठ्या कढईत तुपात गव्हाचे पीठ शेकण्यासाठी खुपच वेळ लागतो.''

दिव्याने विचारले, ''हा एक प्रकारचा हलवा आहे. खरे ना ? तुम्ही यात साखर केव्हा टाकणार ?''



एवढयात त्यांनी मनप्रितच्या आईला पाहिले आणि त्यांना भेटण्यासाठी धावले. दिव्याने विचारले, ''काकू तुम्ही काय करीत आहात ?'' ''बेटा आम्ही तव्यावर शेकण्यासाठी पोळ्या लाटत आहात !'' एकाच वेळेस किती सर्व पोळ्या तयार होतात ? ते पाहून दिव्या आश्चर्यचकित झाली. ती म्हणाली, ''मी मदत करू शकते ?'' काकू म्हणाल्या, ''हो निश्चित ये आणि प्रयत्न कर, येथे सर्व मदत करू शकतात, परंतु अगोदर तू हात धुवून ये.''



दिव्याने हात धूतले आणि तव्याजवळील गटात जोडली गेली. तवा खूपच गरम होता. पोळ्या तव्यावरून उतरत होत्या त्यावर तीने तूप लावण्याचे सुरू केले.

स्वस्तिक आश्चर्याने म्हणाला, ''एवढा मोठा स्वयंपाक बनविण्यासाठी सर्व वस्तू कोण आणतात ? एका महिलेने उत्तर दिले.'' येथे प्रत्येक जन एक किंवा दुसऱ्या रितीने सहयोग देतो. कोणी वस्तूंची व्यवस्था करतात, कोणी पैसै देतो, आणि इतर कामात मदत करतात.

मनप्रीत म्हाणाला, ''तर स्वस्तिक, तुला कसे वाटले ?''

स्वस्तिक म्हणाला, ''हो प्रत्येका सोबत काम करण्याची खूपच मजा आली.'' पोळ्या, भात, हलवा, डाळ आणि भाजीपाला – हे सर्व एवढया लवकर तयार होतात ते आम्ही क्वचितच पाहिले आहे.

अरदास (प्रार्थना) नंतर कढाहप्रसाद देण्यात आला. कित्येक मुलांनी ओसरीमध्ये पाथरण आंथरले आणि सर्व लोक लंगरसाठी लाईनमध्ये बसले. काही लोक जेवणाचे वाढत होते आणि काही पाणी देत होते. सर्वजण सोबत जेवले.

जेवल्यानंतर प्रत्येकाने स्वत:ची थाळी घेतली आणि तिला एका मोठ्या ड्रममध्ये ठेवली. जे लोक वाढत होते ते शेवटी जेवले. त्यांनी जागा स्वच्छ केली आणि भांडी स्वच्छ केली.

''स्वस्तिक, तू अगोदर कधीही अशी व्यवस्था पाहिली आहे का ?'' मनप्रितने विचारले.



## या विषयी चर्चा करा :

- गुरूद्वारांमध्ये ''सोबत स्वयंपाक करणे आणि जेवणे'' त्याला लंगर असे म्हणतात. तुम्ही कधी लंगरमध्ये जेवण केले आहेत का ? कुठे आणि कधी ?
- किती लोकं तिथे स्वयंपाक करीत होते आणि किती लोक तेथे वाढत होते ?
- असे इतर कोणते प्रसंग आहेत ज्यामध्ये तुम्ही इतर लोकांसोबत बसून जेवले असाल ? केव्हा आणि कुठे ? तिथे स्वयंपाक कोणी बनविला होता आणि कोणी वाढले होते ?



गुरूद्वारा लंगरचे वेगवेगळी दृश्ये

**शिक्षकांसाठी :** गुजरातच्या यात्राधामांमध्ये चालणाऱ्या अन्नक्षेत्र आणि तेथील व्यवस्थे विषयी माहिती द्यावी तसेच त्याचे फोटोग्राफ किंवा व्हिडीयो एकत्रित करून विद्यार्थ्यांना दाखविणे. तसेच लग्न-प्रसंगी, धार्मिक सणांच्या वेळी किंवा अन्य एखाद्या मेळाव्याच्या प्रसंगी आयोजित भोजन समारंभ बाबतींची चर्चा वर्गखंडात करावी.

# प्रकरण २१

# जग माझ्या घरामध्ये

## ओढाताण

दररोज प्रमाणे आजपण ममताच्या घरात भांडण सुरू झाले. की टी.व्ही. वर कोणता कार्यक्रम पहायचा ? ममताचा भाऊ क्रिकेट मॅच पाहू इच्छित आहे, तर लहानशी सेजलला तिचे आवडते गीत. आई आणि काकू असे तर प्रिय मैत्रिणी आहेत, पण त्यांची आवड वेगवेगळी आहे. आईला बातम्या पहायला आवडतात तर काकूला धारावाहिक. ममताला कार्टून पहावयाचे आहे आणि पप्पांना फूटबॉल मॅच. पप्पा म्हणतात की, त्यांना संध्याकाळीच टी.व्ही. पहायला मिळतो. शेवटी प्रत्येकाला फूटबॉल मॅचच पहावी लागली.



## चला चर्चा करूया :

- तुमच्या घरात पण पंखा, टीव्ही वर्तमानपत्र, खूर्ची किंवा इतर वस्तूंसाठी भांडण होते का ?
- तुमच्या घरात अशी भांडणे कोण संपुष्टात आणते ? त्याचे निवारण करतात ?
- तुमच्या घरातील एखाद्या विशेष घटनेविषयी गोष्ट करा, जेव्हा एखाद्या वस्तूसाठी भांडण झाले असेल.
- तुम्ही लोकांना इतर कुठे भांडतांना पाहिले आहे का ?

## फरक का ?

संध्याकाळचे ७:०० वाजले आहेत. प्रतिभा तिच्या मैत्रिणीच्या घरून धावत–धावत स्वत:च्या घरी जात आहे. तिचे भाऊ संदीप आणि संजय त्यांच्या मित्रांसोबत गल्लीत खेळण्यात व्यस्त आहेत. त्यांना घरी जाण्याची घाई नाही. जर ते घरी उशिरा गेले. तरीपण त्यांना कोणी बोलणार नाही.



प्रतिभाला वाटते की हे बरोबर नाही. तिच्यासाठी वेगळे नियम आणि तिच्या भावांसाठी वेगळे नियम. असे का ? परंतु ती काय करेल ?

## चला, चर्चा करूया :

- या बाबतीत तुमच्या घरात किंवा तुमच्या मित्राच्या घरात असे होते का ? तुम्ही त्या विषयी काय विचार करतात ?
- तुम्ही असा विचार करतात का मुले आणि मुलींसाठी, पुरूष आणि महिलांसाठी वेगवेगळे नियम असले पाहिजे ?

- जर मुलींनी मुलांसाठीचे आणि मुलांनी मुलींसाठीचे परंपरागत रीते चालत आलेले नियम पाळायचे असतील तर काय होईल ? विचार करा.

## मीना काकू



एक दिवस मीना काकू, पिन्टू आणि पिंकी तसेच त्यांच्या मित्रांना समुद्र किनारी घेऊन गेल्या. ते रेती आणि पाण्यात खेळले.आकाशपाळण्यात बसले. त्यानंतर त्यांनी भेळपूरी खाल्ली.आणि फूग्गे घेतले. नंतर प्रत्येकाने बर्फ गोळा – कुल्फीची मजा घेतली. कुल्फी विकणाऱ्याने पैसे घेण्यात चूक केली. त्याने सातच्या ऐवजी पाच कुल्फीचे पैसे मोजले. मुलांनी विचार केला, ''आपले पैसे वाचले.'' परंतु मीनाकाकूने कुल्फी विकणाऱ्यास सात कुल्फीचे पैसे चूकविले.

मीनाकाकूने त्या दिवशी जे केले त्याची बालके नेहमी आठवण ठेवतील.

- तुमच्या कल्पनेने या गोष्टीचा शेवट बदलून गोष्ट तुमच्या नोटबुकमध्ये लिहा.

- तुमच्या कुटुंबात कोणी मीनाकाकू सारखे आहे का ? कोण ?
- जर मीनाकाकूने कुल्फी विकणाऱ्यास कमी पैसे चुकविले असते तर बालकांनी काय विचार केला असता ? या विषयी तुम्ही काय विचार करतात ?

## मी काय करू ?



अक्षयला त्याची आजी खूप आवडते. त्याची आजीपण त्याला खूपच प्रेम करते. त्या स्वच्छतेच्या खूपच आग्रही आहेत. अनिल अक्षयचा मित्र आहे. त्याच्या आजीला पण अक्षय आवडतो, परंतु एक गोष्ट ती वारंवार सांगते की, तू अनिलच्या घरी कोणतीही वस्तू खायची किंवा प्यायची नाही. कारण की त्याच्या घरी पुन्हा पुन्हा कोणीना कोणी आजारी असते.

एके दिवशी अनिलच्या घराजवळ मोठ्या मैदानात वॉलीबॉल मॅच होती. त्या दिवशी खूप गरमी होती आणि प्रत्येक जण मॅचनंतर खूप थकले होते आणि तहान पण लागली होती. अनिलने सर्वांना त्याच्या घरी आमंत्रण दिले. अनिलच्या आईने सर्वांना पाणी दिले, सगळ्यांनी पाणी पिले. जेव्हा अनिलने पाण्याचा प्याला अक्षयला दिला. त्याला अचानक त्याच्या आजीच्या सूचनेची आठवण झाली. अक्षय अनिलसमोर पहात होता, त्याला समजत नव्हते की काय करावे.

## या विषयी चर्चा करा :

- तुम्हाला काय वाटते, अक्षय काय करेल ?
- अक्षय का गोंधळला आहे ?
- अक्षयच्या आजीने त्याला अनिलच्या घरी पाणी पण न पिण्याची सूचना का दिली ?
- तुम्ही अक्षयच्या आजीसोबत सहमत आहात का ?
- तुमच्या मते अक्षयने काय केले पाहिजे ?

## कोण नक्की करेल ?

करसन खूपच मोठ्या कुटुंबातील आहे. कुटुंबामध्ये शेती आणि पैशाच्या बाबतीचे सर्व काम त्याचे मोठे काका सांभाळतात. कुटुंबातील लहान–मोठे सर्व निर्णय पण तेच घेतात.




आत्तापर्यंत तर करसन शेतातच काम करीत होता. परंतु, आता त्याला काही वेगळे करायचे आहे. त्याला बँकेतून काही रूपये घेऊन आणि धान्य दळण्याची चक्की (गिरणी) खरेदी करायची आहे. त्यांच्या गावात चक्की नाही. करसनला स्वत:वर विश्वास आहे की या नवीन कामाने त्याच्या कुटुंबाला खूपच फायदा होईल. वडीलांना तर त्याने मनवून घेतले, परंतु त्याचे मोठे काका त्याची गोष्ट ऐकायलाच तयार नाही.

**शिक्षकांसाठी :** ही उदाहरणे आपल्या रोजच्या जीवनात होणाऱ्या परिस्थितीवर प्रतिबिंब पाडते. हे वारंवार आपल्यावर परिणाम करते. मुलांना त्या विषयी विचार करण्यास सांगा आणि वर्गात चर्चा पण करावी.

## या विषयी चर्चा करा :

- तुम्ही जर करसनच्या जागेवर असते तर काय केले असते ?
- तुमच्या सोबत असे कधी झाले आहे की तुम्हाला काही करायचे आहे आणि तुमच्या कुटुंबातील वडीलधारे त्यासाठी मंजूरी देत नसतील ?
- तुमच्या घरात महत्त्वाचे निर्णय कोण घेतात ?
- तुमच्या कुटुंबात एकच व्यक्ति सर्वांसाठी निर्णय घेत असेल तर तुम्हाला कसे वाटेल ?



## मला हे आवडत नाही !

मीना आणि रितु लंगडी खेळून घरी जात होत्या. मीनाने रितुचा हात ओढून सांगितले, ''ये माझ्या घरी ये.'' तुझे काका घरी आहेत का ? जर ते असतील, तर मी नाही येणार. रितूने उत्तर दिले.



''पण तू हे काय सांगत आहे ? काकांना तू फार आवडते. ते सांगतात की तूझी मैत्रिण रितूला घरी घेऊन ये. मी तुम्हाला दोघांना खूप चॉकलेट देईल.''

रितूने तिचा हात मीनाजवळून सोडवून सांगितले, ''मला तुझ्या काकाची भीती वाटते. ते माझा हात पकडतात ते मला आवडत नाही.''

एवढे बोलून रितू घरी निघून गेली.

**शिक्षकांसाठी :** रितूला झालेले अनुभव इतर बालकांना पण झाले असतील. जर बालके वर्गात ही चर्चा करतील तर, ते त्यांचा विश्वास वाढवण्यास व सहानुभूती अनुभव करण्यास मदत करेल. एखाद्या बाबतीत तुम्हाला वाटले तर थोड्या बालकांना व्यक्तिगत रीतीने बोलावून गोष्ट करु शकतात. जर शाळेत सल्लागार असेल तर तुम्ही त्यांची मदत घेऊ शकतात.

## या विषयी गोष्ट करा :

- तुम्हाला कधी कोणाचे स्पर्श करणे आवडले नसेल असे झाले आहे का ? कोणी स्पर्श केलेला तुम्हाला आवडत नाही ?
- जर तुम्ही रितुच्या जागेवर असाल, तर काय कराल ?
- जेव्हा अशी घटना घडते तेव्हा दुसरे काय करू शकतात ? चर्चा करा.
- प्रत्येकाचे स्पर्श करणे सारखे नसते. रितूला मीनाचे काका हात पकडतात ते आवडत नाही,परंतु तिचा मीना हात पकडते ते आवडते. तुम्ही विचार करा हा फरक का आहे ?



**शिक्षकांसाठी :** बालके जेव्हा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे मादक (नशिले) पदार्थाच्या सेवनाच्या गोष्टी विषयी देवाण-घेवाण करतात तेव्हा खूप काळजीपूर्वक आणि संवेदनाशीलतापूर्वक घ्यावी. मादक पदार्थांच्या हानीकारक परिणामांची वर्गात चर्चा करू शकतात. या प्रकारच्या मुद्यांचे प्रशिक्षण कार्यक्रमात चर्चा करता येते.

या कुटुंबातील बालके (मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्या) पण या प्रकारच्या सवयींनी झपाटले जाऊ शकतात. त्यांना त्यामधून वाचविण्यासाठी वेळेवर प्रतिक्रिया द्यावी लागते. शिक्षकांच्या सूचनेने बालकांद्वारे या विषयावर चार्ट आणि पोस्टर बनविता येतील. आणि वर्गात चर्चा पण करता येईल.



# प्रकरण २२
# पटोळां

पाटण शहराच्या साळवीवाडामध्ये राहणाऱ्या मोक्षा आणि निर्मलचे घर रंगीबेरंगी रेशमच्या लड्यांनी (आटीनी) भरलेले असते. त्यांची आई कोकिलाबहेन आणि वडील अशोकभाई तसेच परिवारचे सर्व लोकं हातमागावर हस्तकारागीरी (विणणे) करतात. त्यांची ही हस्तकारागीरी खूपच सुंदर आणि विशिष्ट प्रकारची असते.

साळवीवाड्यात अनेक शतकांपासून साळवी परिवार वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या द्वारे करण्यात येणारे विशिष्ट प्रकारचे विणकाम 'पटोळां' नावाने ओळखले जाते. आता या ठिकाणी भारत आणि जगभरातून येणारे पर्यटक या हस्तकारागीरीने अवगत व्हावे म्हणून 'पटोळा हाउस' चे पण निर्माण करण्यात आले आहे. पाटणमध्ये असलेली 'राणीची वाव' च्या शिल्पकामात पण पटोळांची नक्षी आहे. ज्या–त्या वेळी शिल्पकारांनी स्वत:च्या कलेत कोरली होती. गुजरातच्या कवींनी पण लोकगीतात पटोळ्याच्या या कलेचे मन:पूर्वक वर्णन केले आहे जसे की,

''छेलाजी रे.... मारी हाटूं पाटणथी पटोळां मोंघा लावजो....''

ही कला मोक्षा आणि निर्मलच्या आई–वडीलांनी त्यांच्या वडिलधाऱ्यांकडून शिकली होती. आता मोक्षा आणि निर्मल पण शाळेमधून आल्यावर त्यांच्या आई वडीलांची मदत करतात आणि ही कला शिकतात.

**शिक्षकांसाठी :** बालकांना अधिकतर परंपरागत कला घरीच शिकता येते या गोष्टीने अवगत करा. पटोळ्याप्रमाणेच वेगवेगळ्या प्रकारचे हातवणाटकाम शिकता येते. तुम्ही इतर परंपरागत व्यवसाय जसे की, जाजमवणाट, खेळणी बनविणे, अत्तर बनविणे वगैरे विषयी चर्चा करा.



पाटणचा पटोळां बनविण्याची रीत

## दोऱ्यापासून कपडयापर्यंत

पटोळ्याच्या विणकामात वापरण्यात येणारा रेशमचा तार मलबारी सिल्क (कशेटा सिल्क) मधून बनविण्यात येतो. जो पांढरा असतो.वडील हा रेशमचा तार बाहेरून मागवतात. रेशमच्या तारांना खोलून ताणां (उभे तार) आणि वाणा (आडवे तार) बनविण्यात येतात. त्यानंतर त्याच्यावर डिझाईन करण्यात येते. डिझाईन असलेल्या तारेला योग्य माप घेऊन दोरी बांधण्यात येते. ज्याला बांधणीकाम असे म्हणतात. ज्या भागात रंग करायचा असतो त्या भागाचा दोरा सोडून त्याच्यावर मापाप्रमाणे रंग करून त्याला पुन्हा बांधून देण्यात येते. हे काम खूपच मेहनत आणि वेळ घेते. ताणा आणि वाणाच्या तारवर डिझाईन आणि रंगकाम झाल्यानंतर त्याला वणाट (विणण्यासाठी) साळावर (मागावर) रचून 'विणकाम' करण्यात येते. असे चार ते सहा महिन्याच्या मेहनती नंतर सुंदर आणि रंगीबेरंगी ''पटोळुं'' तयार होतो.

ताणां आणि वाणां पक्क्या रंगांनी रंगलेले असल्यामुळे पटोळ्याचा रंग धुतल्या जाण्याचा प्रश्नच रहात नाही. पटोळ्याचे टिकाऊपण आणि रंगाची चमक अनेक वर्षांपर्यंत ताजी राहते. यामुळे गुजरातमध्ये म्हण पडली आहे की.

''पडी पटोळे भात, फाटे पण फीटे नही.''

## हस्तकारागिरी धोक्यात :

पटोळां तयार करण्यासाठी विणकाम, डिझाईन आणि रंगकामाच्या शिकण्यासाठी चिवटपणा आणि धीर जरूरी आहे. याला खूप दिवसांची मेहनत लागते. मलबारी सिल्कचे तार आणि रंग खूपच महाग असल्याने 'पटोळां' खूपच उच्च किमतीत विकला जातो. प्राचीन काळापासून चालत आलेली ही हस्तकारागीरी सोबत जोडलेले ७०० परिवारापैकी आता फक्त तीनच परिवार पटोळ्याच्या या अनमोल हस्त कारागीरीला जीवंत ठेवण्यासाठी संघर्ष करीत आहेत. इतर अनेकांनी हा व्यवसाय सोडून दिला आहे.

पाटणच्या पटोळ्याची हस्तकारागीरी फक्त पाटणचीच नाही, परंतु गुजरात आणि भारताची शान आणि देशाचा गौरव आहे.

प्राचीन वारसा आणि भारतीय संस्कृतीची ओळख असणाऱ्या 'पटोळा'ची ही अमूल्य आणि अजोड (अतुलनीय) हस्तकारागीरीला लुप्त होण्यापासून थांबविण्यासाठी आपण 'पटोळां'ची चांगली किंमत देऊन या लुप्त होणाऱ्या हस्तकारागीरांच्या 'कसबी' यांना मदत केली पाहिजे. नाही तर, ही किमती कला कायमस्वरूपी नष्ट होईल.

पटोळां

## चर्चा करा :

मोक्षा आणि निर्मल ही सुंदर कला त्यांच्या मुलांना शिकवू शकतील का ?

## तुमच्या नोटबुकमध्ये लिहा :

- तुम्ही कोणाला कधी साळ (माग) वर काही विणतांना पाहिले आहे का ? ते काय विणत होते आणि कुठे ?
- साडीचे दोरे रंगविलेले असतात. तुम्हाला इतर कोणतीही वस्तू ज्याला रंग करण्यात येतो तशी माहित आहे का ?
- तुम्हाला कोणते दुसरे असे काम माहित आहे का जेथे अनेक माणसे एकाच ठिकाणी काम करीत असतील ? ते कोणती वस्तू बनवितात ?
- ती वस्तू बनविण्याच्या पद्धती विषयी माहिती मिळवा.
- ती वस्तू बनविण्यासाठी महिला आणि पुरूष वेगवेगळ्या प्रकारचे काम करतात का ?
- ती वस्तु बनविण्यासाठी बालके पण मदत करतात का ?

## शोधून काढा आणि लिहा :

- लोहार, सुतार आणि कुंभारा सोबत त्यांच्या कामाच्या प्रकाराविषयी चर्चा करा.

- ते त्यांचे काम करण्यास कुठे शिकले ?



**शिक्षकांसाठी :** अनेक परंपरागत व्यवसायांमध्ये वेगवेगळ्या प्रकारची साधने आणि कला वापरली जाते. कुटुंबातील सर्व सदस्य एकच वस्तू बनवतील आणि प्रत्येक जण वेगवेगळी जबाबदारी आणि कर्तव्य बजावतील त्यावर भार देतात.

- त्यांना काम करण्यासाठी काय शिकावे लागते ?

- त्यांनी हे काम त्यांच्या कुटुंबात किंवा इतर कोणत्या व्यक्तिला शिकविले आहे का ?

- खालील कोष्टकात लोकांद्वारे होणाऱ्या वेगवेगळ्या कामांची यादी दिली आहे. असे काम करणाऱ्या लोकांना तुम्ही ओळखतात ? त्यांची नावे पहिल्या कॉलममध्ये लिहा. दुसऱ्या कॉलममध्ये ते त्यांचे काम कोणाजवळून शिकले ? ते लिहा.

| कामाचा प्रकार | जे हे काम करतात तशा माणसांची नावे | ते हे काम कुठून शिकले आहेत ? |
|---|---|---|
| कापड विणणे | मोक्षा आणि निर्मलाचे आई-वडील | त्यांच्या वडीलधाऱ्यांपासून |
| स्वयंपाक करणे | | |
| सायकल दुरूस्त करणे | | |
| बस चालविणे | | |
| शिवणे आणि भरतकाम | | |
| गायन | | |
| चप्पल बनविणे | | |
| पतंग बनविणे | | |
| शेतीकाम | | |
| केस कापणे | | |

**शिक्षकांसाठी :** भारतात पाटणच्या पटोळ्याप्रमाणे काही ठिकाणे विशिष्ट प्रकारच्या वस्तू बनविण्यासाठी प्रसिद्ध आहेत. या वस्तू तिथे बनविल्या जातात त्या जागेच्या नावावरून प्रसिद्ध होतात. जसे की, कुलुची शाल, मधुबाची चित्रे, आसाम सिल्क, काश्मिरी भरत, कच्छी भरतकाम,जेतपुरची बांधणी, थानगढचे मातीकाम वगैरे. तुम्हाला इतर जास्तीचे उदाहरणे माहिती आहेत का ? त्याची वर्गात चर्चा करा.




आज सकाळपासूनच झीलच्या घरात धावपळ आहे. अरविंदकाका आणि त्यांचे कुटुंब पांच वर्षानंतर घरी येणार आहे. पांच वर्षा पूर्वी अरविंदकाकांना अबुधाबीमध्ये नोकरी मिळाली होती. तेव्हापासूनच ते तिथे राहत होते. झील आणि तिचे वडील त्यांना घेण्यासाठी विमान तळावर गेले.

विमान हवेमधून जमिनीवर खाली उतरल्यानंतर, प्रवाशांना स्वत:चा सामान घेण्यासाठी थोडा वेळ वाट पहावी लागते. शेवटी अरविंद काका, नीताकाकू आणि त्यांची मुले बाहेर येतांना दिसली. ''हेन्सी आणि पल मोठे झाले आहेत.'' पप्पा म्हणाले, सर्व सामान गाडीमध्ये रचून आणि सर्व झीलच्या घराकडे निघाले.

झील म्हणाली, ''हेन्सी, तू लांबच्या प्रवासामुळे थकली असशील, पप्पा म्हणत होते की अबुधाबी भारतापासून खूपच दूर आहे.''

**शिक्षकांसाठी :** बालकांना पृथ्वीचा गोळा किंवा जगाच्या नकाशात विविध स्थळे दाखविणे आणि तेथील हवामान, वनस्पती, चलणी नाणे वगैरेवर चर्चा करावी.



हेन्सी म्हणाली "अरे नाही, आम्ही अजिबात थकलो नाही. आबुधाबी भले भारतापासून दूर आहे पण विमानाने यायला फक्त दोन तासच लागले. विमान खूपच वेगाने उडते."

झील आश्चर्यचकित होती. जेव्हा ती शाळेमधून दिल्लीच्या प्रवासाला गेली होती तेव्हा तिला ट्रेन मध्ये वीस तास लागले होते. परंतु नकाशात जूनागढ आणि दिल्ली खूपच जवळ वाटतात. झील, हेन्सी आणि पलने विमानतळापासून घरापर्यंत खूपच गोष्टी केल्या. झील तिला प्रवासात किती मजा आली होती ते आठवण करत होती.ती इच्छित होती हेन्सी तिच्या अबुधाबीच्या प्रवासाविषयी सर्वच सांगेल.



## रेतीच रेती !!

झीलने विचारले, "तुम्ही विमानातून पुष्कळ रसप्रद वस्तू पाहिल्या असतील खरे ना ?"

हेन्सी म्हणाली, "आम्ही खूप वादळे पाहिली. कारण की विमान खूप उंच होते, ढगांपेक्षा पण वर." ते खूप वर जाईल त्या अगोदर आम्ही पाहिले की ते रेताळ प्रदेश वरून उडत होते. तिथे रेतीच रेती होती. परंतु रेतीचा रंग बदलत होता – पांढरा, चॉकलेटी, लाल, काळा. आम्ही रेतीचे पर्वत पण बनलेले पाहिले. पल म्हणाला, "त्यांना रेतीचे ढिग असे म्हणतात." झील म्हणाली, "मी रेती फक्त समुद्रकिनारी पाहिली आहे." अरविंदभाई म्हणाले, "तर तुला आमच्या येथे आलेच पाहिजे."





आबुधाबीच्या आजूबाजूचे देश रणप्रदेशमध्ये आलेले आहेत. जर शहरापासून थोडे दूर गेले तर मैलांपर्यंत रेतीच दिसते. ना वृक्ष, ना हिरवळ, फक्त रेती.

नीताकाकी म्हणाली, ''मी गुजरातच्या आपल्या घराच्या आजूबाजूची दाट हिरवळ आणि गारव्याचे स्वप्न पहात होती. हे सर्व खूपच दिवसांनी पाहून मी खूप आनंदित झाले आहे.''

पाऊस कसा असतो ? ही गोष्ट तर हेन्सी आणि पल विसरले आहेत. तुम्हाला माहिती आहे रण प्रदेशात पाऊस पडत नाही. तिथे पाणी खूपच किमती आहे. ना पाऊस, ना नद्या,ना तलाव, ना डबके. जमिनीच्या आत पण पाणी नसते. पल म्हणाला, ''परंतु रेतीत खूप तेल असते त्यामुळे या देशांमध्ये पेट्रोल सहजपणे मिळते.'' अरविंदकाका म्हणाले, ''पेट्रोल खरोखर पाण्यापेक्षा स्वस्त आहे.''



गोष्टी करता-करता सर्व झीलच्या घरी पोहचले. हेन्सी आणि पल खूप फळांची वृक्ष पाहतच राहिले. केळी, नारळ, फणसी, पपई, सुपारी. किती प्रकारची वृक्षे ! पल म्हणाला, ''आम्ही तिथे फक्त एकाच प्रकारचे वृक्ष पाहिले आहे – खजूर, कारण की ते एकच आहे जे रणात उगू शकते.''






## किती सुंदर भेट वस्तू आणि फोटोग्राफ्स !

सगळ्यांना भेटल्यानंतर नीताकाकूने त्यांची बॅग उघडली. त्यांनी सर्वांसाठी भेट आणली होती. स्वादिष्ट आणि गोड–गोड खजूर पण. पलने झीलला कित्येक नोटा आणि सिक्के दाखविले. हेन्सीने समजविले की ते आबुधाबी मध्ये ज्या पैशाचा उपयोग करतात त्यांना 'दिरहाम' म्हणतात. त्याच्यावर तेथील स्थानिक भाषा – अरबी भाषेमध्ये काहीतरी लिहिलेले असते. ते जेथे राहत होते त्या जागेचे कित्येक फोटोग्राफ्स पण दाखविले.



अरविंदकाकाने झीलला पृथ्वीचा गोळा दिला. ते म्हणाले, "झील तू या गोळ्यावर शोधून काढ अबुधाबी कुठे आहे ? आणि गुजरात कुठे आहे ? "बालकांनी गोळ्यासोबत खूपच मजा केली आणि त्यावर वेगवेगळ्या जागा पाहिल्या. झीलने दिल्ली आणि जूनागढ पण शोधले.

संध्याकाळी सर्व चौकात बसले, हवेची मजा घेत फोटोग्राफ्स पण पाहिले. त्यांनी पाहिले की अबुधाबीमध्ये घरे खूप उंच आणि काचेची खिडकी असलेले होते. झील म्हणाली, "या खिडकींमधून छान थंड हवा येत असेल." अरविंदकाका म्हणाले, "आम्ही उष्णतेमुळे खिडक्या उघडूच शकत नाही." अधिकतर घरांमध्ये ऐ.सी. असतो. खूपच उष्णतेमुळे तेथील लोक मऊ





सुतीकपडे घालतात. आणि स्वत:ला संपूर्ण कपड्यांनी झाकून ठेवतात. त्यांचे डोके पण झाकलेले असते. हे त्यांना सूर्याच्या प्रखर उष्णतेपासून वाचवते.

झीलला तिच्या चूलत काकांच्या मूलांसोबत फोटोग्राफ्स पाहण्याची आणि दुसऱ्या देशाविषयी समजून घेण्याची खूप मजा आली. ती तिचे शहर आणि त्यांनी आबुधाबी विषयी जे सांगितले त्यांची तुलना करीत होती. तिने आबुधाबी विषयी स्वत:च्या वर्गासाठी पण अहवाल बनिवण्याचे नक्की केले.

## चर्चा करा आणि लिहा :

- तुम्ही जिथे राहतात त्या जागे सोबत आबुधाबीचा तुलना करणारा अहवाल तुम्ही पण बनवा. तुम्ही खाली दिलेल्या काही मुद्यांचा अहवाल लिहिण्यासाठी उपयोग करू शकतात. त्याचे चित्र काढू शकतात किंवा फोटोग्राफ्स ठेवू शकतात.
  - हवा आणि हवामान
  - लोकांचा पोषाख
  - वृक्ष आणि रोप
  - वेगवेगळ्या प्रकारची घरे
  - रस्त्यावरील वाहनव्यवहार (वाहनांचा प्रकार)
  - सामान्य खाण्याच्या वस्तू
  - भाषा
- वाळवंटात वृक्ष का कमी असतात ?

---

- तुमचे कोणी नातेवाईक दुसऱ्या देशात राहतात का ? जर हो, तर कुठे ?

---



- ते तिथे किती राहिले ? ते तिथे शिकायला गेले होते की कामासाठी गेले होते ? की इतर कोणते कारण होते ?

### या सर्व चलणी नोटा पहा :

प्रत्येक नोटच्या चित्राच्या बाजूमध्ये दिलेल्या बॉक्समध्ये त्याची किंमत लिहा.












- हे चलन कोणत्या देशाचे आहे ? तुम्ही कशा रितीने ओळखाल ?

- तुम्हाला नोटांवर कोणाचे चित्र दिसत आहे ?

- दहा रूपयाची नोट घ्या आणि काळजीपूर्वक अवलोकन करा. तुम्ही नोटवर किती भाषा पाहू शकतात ?

- नोटवर दिलेल्या बँकेचे नाव लिहा.

## शिक्क्यांचे अवलोकन करा. पुढील-मागील बाजूप्रमाणे त्यांना जोडा :



- कोणता सिक्का जोडल्या शिवाय शिल्लक राहतो ?

- या शिक्यापैकी तुम्ही किती ओळखू शकतात ?





- शिक्यावर मूल्या शिवाय दुसरे काय लिहिलेले आहे का?

---

- या नोटा पहा. त्या सर्व भारताच्या आहेत का ? ज्या नोटा भारताच्या नाहीत त्यावर गोल करा. त्या कोणत्या देशाच्या नोटा आहेत शोधून काढा.





**शिक्षकांसाठी :** चलणी नोटवर छापलेल्या क्रमांकामुळे नाणे डबल होत नाही. या बाबतची वर्गात चर्चा करा.



# प्रकरण २४
# मसालेदार कोडी



ताजी असेल तर हिरवी, सुकून गेली तर लाल;
नुसती कच्ची खाईल, त्याचे तोंड होईल लाल.
तिखट तिखट स्वाद माझा, स्वयंपाकात टाकतात;
जास्त खायला जाणार तर, नाकात पाणी आणेल.
बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?




पिवळा-पिवळा रंग माझा, तूरट माझा स्वाद;
स्वयंपाकात नि कोशंबीरीमध्ये, येते सर्वांना आठवण.
लहान-लहान बाबतीत, मी औषध बनून जाते;
दूधासोबत मिसळल्यावर, खोकला पळून जातो.
बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?




लहान लहान मोत्या सारखी, लहान पण मी गोल;
आतून मी पांढरी आहे, पण वर काळा रंग,
कचुंबर की नमकीन मध्ये, आनंदाने टाकतात;
जिभेवर मला ठेवले तर तर तिखट स्वाद आणते.
बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?



पातळ नि लहान आहे, काळे आणि भुरे आहे;
तेल–तूपात तळले जाते, दही–ताकात टाकले जाते;
स्वयंपाकात मी सापडते, नि सुगंधीत बनवितो;
पावडर किंवा अखंड, उपयोगात मी येते.
बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?



पातळ नि लहान मी तर, हिरवी हिरवी गार;
मुखवास नि शरबतमध्ये, आणून देते दम;
हिरवी–कोरडी चावा तुम्ही, तरी पण लागते गोड;
जिऱ्या सारखी लागते मी तर, जेव्हा तुम्हाला देठात.
बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?




**चॉकलेट सारखा रंग माझा, शिंगे असलेली चीज;**

**खिळ्यासारखी दिसते मी तर, मसाल्याचे बीज.**

**दाताच्या दुखण्यात मी, खूप कामात येते;**

**तिखट माझा स्वाद पण, मुखवासात आवडते.**

**बोला बोला लवकर बोला, बोला मी आहे कोण ?**



आता दुसऱ्या दोन मसाल्यांवर तुमचे स्वत:चे दोन कोडी बनविण्याचा प्रयत्न करा. ती कोडी तुमच्या वर्गात विचारा. या दोन मसाल्याची चित्रे तुमच्या नोटबुकमध्ये काढा आणि त्यांची नावे लिहा.

- तुमच्या घरात स्वयंपाक करण्यासाठी कोणकोणत्या मसाल्यांचा उपयोग होतो ? ते शोधा त्याची यादी बनवा. आणि तुमच्या मित्राची यादी पण पहा.

- जेव्हा तुमचे आजी-आजोबा लहान होते तेव्हा त्यांच्या स्वयंपाक घरात अधिकतर कोणत्या मसाल्यांचा उपयोग व्हायचा ? त्यांच्या जवळून शोधून काढा आणि येथे लिहा.

- एका अशा मसाल्याचे नाव द्या. जे नमकीन आणि गोड दोन्ही वस्तूंमध्ये टाकले जाते.

- स्वयंपाकात आंबट स्वाद आणण्यासाठी त्यात काय टाकण्यात येते ? शोधा.

मी कुट्टन आहे. मी केरळमध्ये राहते. माझ्या घराच्या वाडयात मसाल्याचा बगीचा आहे. तिथे मी तमालपत्र, लहान आणि मोठी विलायची व मिऱ्याची रोपे पाहिली.

- तुमच्या विस्तारात एखादा मसाला उगवतो का ? शोधून काढा. येथे त्यांची नावे लिहा.

- थोडे अखंड मसाले वर्गात आणा. कोष्टकात त्यांची नावे लिहा. तुमचे डोळे बंद करून प्रत्येक मसाल्याला स्पर्श करून आणि सुगंधाने ओळखण्याचा प्रयत्न करा. ज्याला तुम्ही ओळखतात त्याच्या समोर (√) करा. जे तुम्ही ओळखू शकले नाहीत तर (×) करा.

| क्रम | सुगंध | स्पर्श | मसाल्याचे नाव |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| ५. | | | |

**चला, चटाकेदार चणाचाट बनविण्याचा प्रयत्न करूया :**

- त्यासाठी तुम्हाला पाहिजे –
  - वाफवलेले चणे, वर्गात सर्वांसाठी पुरतील एवढे.
  - मीठ, लाल मिरची, आमचूर पावडर किंवा लिंबू स्वादानुसार.

- शेकलेले जिरे, संचळ आणि गरम मसाला, जर शक्य असेल तर.
- कोथंबीर



वाफवलेल्या हरबऱ्यामध्ये स्वादानुसार मीठ, लाल मिरची, आमचूर पावडर, किंवा लिंबूचा रस टाका. तुमचा चाट स्वादिष्ट बनविण्यासाठी जिरे, संचळ आणि धणे पावडर टाका. शेवटी चिमूटभर गरम मसाला पण टाकू शकतो. वाफवलेले चणे व्यवस्थित मिक्स करा. कापलेली कोथंबीर त्यावर पसरवा. अरे वा ! तुमचा चटाकेदार चणाचाट खाण्यासाठी तयार आहे !

- तुम्ही चणाचाटचा आनंद घेतला का ?
- अनुमान करा, जर चणाची चाट बनविण्यासाठी एकही मसाला नसेल तर तो कसा लागेल ?
- वेगवेगळ्या प्रकारचे चाट बनवायला शिका आणि ते बनवून वर्गात तुमच्या मित्रासोबत त्याची आनंद घ्या.
- वस्तू कमी किंवा जास्त चटाकेदार आहे तो तुमच्या जिभेवर कशा रितीने अनुभव होतो ?

**शिक्षकांसाठी :** गरम मसाला : विलायची (लहान आणि मोठी), लवंग, जिरे, तज वगैरे अनेक मसाल्यांचे मिक्स पावडर.



# प्रकरण २५
# माझा जिल्हा

गुजरात राज्य दरवर्षी खेल महाकुंभचे आयोजन करते. त्यात भाग घेऊन स्वत:च्या कलेला दाखविण्यासाठी सर्वजण येतात. शिक्षक आणि विद्यार्थी पण मोठ्या संख्येत येतात. या वर्षी हा कार्यक्रम राज्याची राजधानी गांधीनगर येथे योजण्यात आला. ज्यात भाग घेण्यासाठी राज्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यामधून मोठ्या संख्येत शिक्षक आणि विद्यार्थी आले. आज सर्व विद्यार्थी त्यांच्या शिक्षकांसोबत घ–४ जवळ असलेल्या सेन्ट्रल विस्टा गार्डनमध्ये एकत्र झाले होते. बगीच्यात सर्व एकत्र होऊन गप्पा करत होते. शिक्षक स्वत:चा अनुभव सांगत होते, तर विद्यार्थी स्वत:च्या जिल्हयाची गोष्ट करीत होते.

गोष्टीची सुरूवात करतांना विश्वा म्हणाली : ''मी कच्छ जिल्ह्यामधून आली आहे. आमचे जिल्हा केंद्र भूज आहे. आमच्या जिल्हयात एकूण दहा तालुके आहेत. गुजरातच्या जिल्हयापैकी कच्छ जिल्हा पाकिस्तान सोबत सीमा असणारा आहे, तर भारताच्या राजस्थान राज्याला पण आमचे रण स्पर्श करते. गुजरातचे मोरबी, सुरेन्द्रनगर, पाटण आणि बनासकांठा जिल्हे पण आमचे शेजारी आहेत.''





ज्योती म्हाणाली, ''माझा जिल्हा ........................................ आणि त्याचे प्रमुख केंद्र ................ आहे. जिल्हयाचे एकूण ................ तालुके आहेत. आमच्या जिल्हयाची सीमा ................ आणि ................ राज्यला स्पर्श करते. आमच्या जिल्हयाची सीमा ................, ................, ................, ................ आणि ................ जिल्हे आले आहेत.


**शिक्षकांसाठी :** एकममध्ये जिथे ज्योती बोलली; लिहिलेली माहिती आहे तिथे विद्यार्थ्यांनी स्वत:च्या जिल्हयाची माहिती मिळवून भरायची आहे. त्यासाठी शाळेतून देण्यात आलेल्या स्थानिक साहित्य पुस्तिकेचा उपयोग करावा.



हे ऐकून थॉमस बोलला : ''माझा जिल्हा डांग. माझा जिल्हा विस्ताराच्या दृष्टीने पाहिले तर गुजरातचा सर्वात लहान जिल्हा आहे. त्याचे क्षेत्रफळ १७६४ चौरस किलोमीटर आहे. तो सर्वात कमी वस्ती असणारा जिल्हा पण आहे. त्याची वस्ती २,२६,७६९ आहे. गुजरातमध्ये असलेल्या जंगलांचा सर्वात जास्त भाग (५८.५%) माझ्या जिल्ह्यात आला आहे.

ज्योती बोलली : ''आमचा जिल्हा गुजरातच्या जिल्ह्यामध्ये विस्ताराच्या दृष्टीने ............................ स्थान असणारा आहे. त्याचे क्षेत्रफळ ................ चौरस किलोमीटर आहे. त्याची वस्ती ................ आहे. राज्यचे ................ % जंगले आमच्या जिल्ह्यात आले आहेत.





अहमदाबाद जिल्ह्यात राहणारी परवीन बोलली : ''साबरमती नदीच्या किनारी माझे अहमदाबाद शहर वसलेले आहे माझ्या जिल्हयात साक्षरतेचा दर ८६.६५% आहे. माझ्या जिल्ह्यात सीद्दी सैयदची जाळी, कांकरिया तलाव, साबरमती रिवरफ्रन्ट, गांधीआश्रम सारखे प्रेक्षणिय स्थळे आहेत.''

हे ऐकून ज्योती बोलली : ''आमच्या जिल्हयामधून ............................ आणि ............................ नद्या वाहतात. आमच्या जिल्ह्यात असलेले ............................ आणि ............................ शहरे या नद्यांच्या किनारी वसलेले आहेत. आमच्या जिल्ह्याचा साक्षरतादर ............................ % आहे. आमच्या जिल्ह्यात ............................, ............................, ............................, ............................ प्रेक्षाणिय स्थळे आहेत.





मैत्री बोलली : ''मी जूनागढ जिल्ह्यामधून आली आहे. जुनागढमध्ये असलेले गिरनार पर्वतावरील दत्त शिखर गुजरातचे सर्वात उंच शिखर समजले जाते. उंच गढ गिरनार ढगांशी गोष्ट करतो. हे तर तुम्ही ऐकलेच असेल.'' मैत्रीने ज्योती समोर पाहिले म्हणून ज्योती बोलली ''आमच्या जिल्ह्यात पण ........................ आणि ........................ पवर्त आले आहेत.''



गांधीनगर जिल्ह्याचा भाविन म्हणाला : ''माझ्या जिल्हयात अक्षरधाम, महुडी आणि धोळेश्वर महादेव सारखी धार्मिक स्थळ आले आहेत.'' तन्वी मधेच म्हणाली: ''मी महेसाणा जिल्ह्याची आहे. माझ्या जिल्हयात मोढेरा आणि वडनगर सारखी ऐतिहासिक स्थळे आले आहेत. मोढेराचे सूर्यमंदिर तसेच वडनगरचे किर्ती तोरण प्रसिद्ध आहे.''



ज्योती म्हणाली : ''आमच्या जिल्हयात ........................, ........................, ........................, ........................ आणि ........................ सारखी धार्मिक स्थळे आलेली आहेत. जेंव्हा ........................, ........................ आणि ........................ सारखी ऐतिहासिक स्थळे आली आहेत.

कोणी बोलेल त्या अगोदर कृष्णा म्हाणाली : ''माझा जिल्हा नर्मदा. माझ्या जिल्ह्यात असलेल्या नवागाम ठिकाणी नर्मदा नदीवर धरण(बांध) बांधण्यात आले आहे. या बांधमुळे तयार झालेल्या सरोवराचे नाव सरदार सरोवर ठेवण्यात आले आहे. तिथे स्टॅच्यू ऑफ युनिटीचे निर्माण करण्यात आले आहे.''



हे ऐकून ज्योती म्हणाली : ''आमच्या जिल्ह्यात पण ........................ नदीवर ........................ स्थळी धरण बांधण्यात आले आहे.''



बनासकाठा जिल्ह्यामधून आलेला धनराज म्हणाला की : ''माझ्या जिल्ह्याच्या अमीरगढ तालुक्यात जेसोर अस्वल अभयारण्य आणि पालनपुर तालुक्यात बालाराम अभयारण्य आले आहे. जेसोर अस्वल अभयारण्यात अस्वल, नीलगाय, चित्ता, शाहुडी वगैरे तर बालाराम अभयारण्यात अस्वल आणि नीलगाय पहावयास मिळते.''

ज्योती म्हणाली : ''आमच्या जिल्ह्याच्या ........................ तालुक्यामध्ये ........................ आणि ........................ तालुक्यात ........................ अभयारण्य आले आहेत. ज्यात मुख्यत्वे ........................, ........................, ........................, ........................, ........................, ........................ सारखे प्राणी पहावयास मिळतात.





हरभजन बोलण्यासाठी तयारच होता, तो म्हणाला : ''मी सुरेन्द्रनगर जिल्ह्यातील रहीवाशी आहे. माझ्या जिल्हयात आलेल्या तरणेतर गावात भरणारा मेळा भारतात तरणेतरचा मेळा म्हणून खूप प्रसिद्ध आहे. भरत भरलेल्या छत्री सोबत मेळ्यात फिरणारे युवक-युवती मेळ्याचा आनंद घेतात.''

ज्योती त्वरित म्हणाली : ''आमच्या जिल्ह्यात ........................ ठिकाणी ........................ चा मेळा भरतो.''



पंचमहाल जिल्ह्याचा देवेंद्र म्हणाला : ''माझ्या जिल्ह्यामध्ये मकाईचे पीक सर्वात जास्त घेण्यात येते. या शिवाय गहू, तांदूळ, कडधान्ये, भूईमूग आणि तंबाखू सारखे पीक पण घेण्यात येतात.'' दिपिका त्वरीत म्हणाली की : ''मी पोरबंदर जिल्ह्यातून आली आहे. माझ्या जिल्ह्यात सिमेंट आणि रंग-रसायणे उद्योग फार विकसित झाले आहेत.''



हे ऐकून ज्योती म्हणाली : ''आमच्या जिल्ह्यात ........................ चे पीक सर्वात जास्त घेण्यात येते. या शिवाय ........................, ........................ , ........................ सारखे पीक माझ्या जिल्ह्यात घेण्यात येतात माझ्या जिल्ह्यात ........................, ........................ आणि ........................ सारखे उद्योग पण विकसित झाले आहेत.''

## एवढे करा :

- तुमच्या जिल्ह्याचा नकाशा मिळवून, त्यात असलेल्या तालुक्यांची यादी बनवा.
- तुमच्या जिल्ह्यात होणाऱ्या वृक्षांची आणि पीकांची यादी बनवा.
- वर्ष : २०११ च्या वसति गणणेनुसार तुमचा जिल्हा राज्यात कितव्या स्थानावर आहे ? तुमच्या जिल्ह्यापेक्षा जास्त वस्ती असणारा आणि कमी वस्ती असणाऱ्या जिल्ह्याची यादी बनवा.
- एकमात दर्शविल्या शिवायच्या प्रेक्षणिय स्थळांची यादी बनवा.
- तुमच्या जिल्ह्यात आलेल्या धार्मिक स्थाने आणि ऐतिहासिक स्थळांची चित्रात्मक माहिती / चार्ट तयार करा.
- तुमच्या जिल्ह्यात आलेल्या एकमात दर्शविल्या शिवायचे धरण आणि अभयारण्यविषयी माहिती एकत्रित करा.
- जिल्ह्याच्या विविध तालुक्यात भरणाऱ्या इतर मेळ्यांचे स्थान आणि त्यांच्या विशेषता संबंधी माहिती मिळवून चार्ट तयार करा.
- तुमच्या जिल्ह्यात विकसित उद्योग आणि त्यात वापरला जाणारा कच्चा मालाची माहिती एकत्र करा.
- जिल्हा पंचायत आणि त्याच्या कार्या विषयी तुमच्या शिक्षकंजवळून माहिती मिळवा.
- जिल्हा पंचायतची वहीवटी कोण-कोण करते ? त्याची विगत मिळवा.
- तुमच्या जिल्ह्याचा नकाशा मिळवून त्यात खालील विगत दर्शवा.

  – प्रेक्षणिय स्थळे – धार्मिक स्थळे – ऐतिहासिक स्थळे – धरण

  – अभयारण्ये – मेळे – उद्योग
- स्टॅच्यू ऑफ युनिटी विषयी तुमच्या शिक्षकांजवळून अधिक माहिती मिळवा.

**शिक्षकांसाठी :** या एकमात देण्यात आलेली विविध जिल्ह्यांची माहिती फक्त विद्यार्थी स्वत:च्या जिल्ह्याची माहिती प्रस्तुत करायला शिकेल त्यासाठी देण्यात आली आहे. स्वत:च्या जिल्ह्या शिवाय अन्य जिल्ह्याची माहिती विद्यार्थ्याने समजण्याची किंवा लक्षात ठेवण्याची गरज नाही. यासाठी त्याला मूल्यांकनाचा भाग बनवायचा नाही.